# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-७१** **दिनांक - ०१/०३/२०२४**

## अवैध दारु वाहतुक करणा-या आरोपीतास अटक करुन त्यांच्याकडुन ११,३०,४००/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

दिनांक ०१/०३/२०२३ रोजी पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत रात्रौगस्त करत असतांना गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक सोपान पाटील, यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली कि, पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतुन दिनांक ०१/०३/२०२४ रोजी रात्रौ ०१.०० वा.च्या सुमारास एक इसम बोलेरो पिकअप वाहनाने बेकायदेशिर पणे अवैधरित्या दारु घेऊन गुजरात राज्य येथे विक्री करीता घेऊन जाणार असल्याबाबत खात्रीशिर माहिती मिळाल्याने त्यांनी सदरबाबत श्री. कुमारगौरव धादवड, प्रभारी पोलीस निरीक्षक साो, पेल्हार पोलीस ठाणे यांना माहिती दिली असता त्यांनी सदर बातमीची सत्यता पडताळुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश दिले.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशान्वये पेल्हार पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक तुकाराम भोपळे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार यांनी सदर बातमीच्या अनुशंगाने जायका हॉटेलच्या समोर, वाकनपाडा, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथे सापळा रचुन इसम नामे - लवकुश रामनिवास मिश्रा, वय ४३ वर्षे, यास पिकअप क्र. एम एच ४८ सी क्यु ३५७४ हिच्यासह ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यात असलेल्या बोलेरो पिकअपची तपासणी केली असता पिकअप मध्ये २,३०,४००/- रुपये किंमतीचे न्यु टुबोर्ग क्लासिक विथ स्कॉच माल्टस कंपनीचे एकुण ६० बॉक्स त्यामध्ये १,४४० बियरचे टिन मिळुन आले असुन एकुण ११,३०,४००/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरबाबत पेल्हार पोलीस ठाण्यात गु.र.क्र. २७६/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ ई प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त साो, परिमंडळ- ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त साो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कुमारगौरव धादवड, प्रभारी पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. सोपान पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, पो.अं. संजय मासाळ, रवि वानखेडे, वाल्मिक पाटील, मिथुन मोहिते, राहुल कर्पे, दिलदार शेख, निखिल मंडलिक, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




**----0000----**